# कादंबरीः उग्म आणि विकास !

प्रा.डॉ. शिवराज काचे
दयानंद कला महाविद्यालय, लातूर

आधुनिक काळात मराठी साहित्यात अनेक साहित्य प्रकार उदयास आलेले दिसतात. त्यापौकीच सर्वात लोकप्रिय असा ललित वाङ्मय प्रकार म्हणजे 'कादंबरी' होय. कथा-काव्यादी वाङ्मय प्रकाराच्या नंतर जन्म घेऊनही कादंबरी लोकप्रियतेच्या शिखरावर जाऊन बसली आहे. मनोरंजनाचे कलात्मक, अप्रतिम, सहज साध्य व सुलभ असे साधन म्हणजे कादंबरी अशी तिची लोकप्रियता होऊन बसली आहे. कादंबरी हा वाङ्मय प्रकार विशाल व व्यापक जीवनानुभव चित्रित करणारा साहित्य प्रकार आहे.

आधुनिक काळात सर्वात लोकप्रिय असणारा 'कादंबरी' हा साहित्य प्रकार कथात्मक आहे. या परंपरेशी असलेले त्यांचे नाते पूर्णतया तुटलेले नाही. तसे पाहता इतर साहित्य प्रकारांच्या तुलनेत कादंबरी साहित्य प्रकारचा उदय /उग्म उशीरा झालेला निदर्शनास येतो. आज ज्या साहित्य प्रकाराला आपण कादंबरी म्हणून ओळखतो. तो पाश्चात्त्य साहित्याच्या प्रभावातून उदयास आल्याचे दिसून येते. असे जरी असले तरी कादंबरी ही संज्ञा/ नाव मात्र भारतीयच असल्याचे दिसून येते. संस्कृत कवी बाणभट्ट यांनी लिहिलेल्या कादंबरी या नावाच्या अद्‌भूताने नटलेल्या प्रणयरम्य गद्य कथेच्या नायिकेचे नाव कादंबरी होते. तेच नाव बाणभट्टाने त्या कथेला दिले. बाणभट्टाची कादंबरी मूळात विशेषनामाची तिला सामान्य नामाचे मोठे स्थान निर्माण झाले व कादंबरी बनली. ही नायिका अद्‌भूतरम्य, प्रणयरम्य चित्रित केल्याने अद्‌भूतरम्य चित्रण करणा-या ग्रंथासाठी कदाचित हे नाव दिले गेले असावे. एका विशिष्ट त-हेच्या कल्पित कथेला कादंबरी हे नाव मराठीमध्ये ब-याच आधीपासून रूढ असावे, असे दिसते. १८२९ मध्ये प्रसिध्द झालेल्या 'महाराष्ट्र भाषेचा कोष' या ग्रंथात कादंबरी या शब्दाचा तसा अर्थ दिलेला आहे. या वरील विवेचनावरून असे दिसून येते की, कादंबरी हा वाङ्मय प्रकार जरी पाश्चात्त्याच्या अनुकरणाने स्वीकारलेला असला तरी त्याचे कादंबरी हे नामाभिदान मात्र भारतीयच आहे यात तिळमात्र शंका नसावी.

कादंबरी या शब्दाची युत्पत्ती 'कदंब' या वृक्षाच्या फुलापासून झाली. कदंब वृक्षाच्या फुलापासून तयार केलेले मद्य प्राशन करताच मनुष्याला ज्याप्रमाणे ईहलोकाचा विसर पडतो व कल्पनेच्या सुखद संसारात विहार करू लागतो. त्याचप्रमाणे कादंबरी वाचत असताना वाचक तीत इतका तन्मय होतो की, त्यास सभोवतालच्या विश्वाचा विसर पडतो व तो कल्पनेच्या जगाचा आस्वाद घेतो. दारूबंदीही नसलेल्या काळात कादंबरी उन्मादक चौतन्य दायी होती हा उन्मादच वा हे चौतन्य या साहित्य प्रकारात आजूनही आढळते. अशाप्रकारे कादंबरी या शब्दाची व्युत्पत्ती झाली असावी.

कादंबरी या वाङ्मय प्रकाराची व्युत्पत्ती सांगताना का. बा. मराठे म्हणतात की, इंग्रजीतील 'नॉव्हेल' या शब्दावरून मराठीतील या वाङ्मय प्रकाराला 'नावल' असं म्हणटलेलं आहे. त्यांच्या मते नावल म्हणजे चमत्कारीक गोष्ट ज्यात आश्चर्यकारक गोष्ट फार जो वाचला असता अवलपासून अखेर पावेतो वाचणारास नवल वाटावे अशा प्रकारचा जो ग्रंथ त्यास इंग्रजीत 'नॉव्हेल' अशी संज्ञा आहे. 'नॉव्हेल' म्हणजे नवल समूह अशा अर्थ साम्यावरून मराठीतील सदरहू ग्रंथाचे तेच नाव राखिले असता चिंता नाही.' या व्युत्पत्ती मधूनच कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप समजण्यास मदत होते.

कादंबरी वाङ्मयाचा उग्म नेमका कोणत्या देशात झाला हे सांगणे जरी कठीण असले तरी या साहित्य प्रकाराचे बीज फार पुरातन आहे. कुसुमावती देशपांडे यांनी 'मराठी कादंबरीचे पहिले शतक' या ग्रंथात कादंबरीची पूर्वपीठिका सांगतात की, 'गोष्टी वेल्हाळपणा हा मानवाचा एक स्वाभाविक विशेष आहे. भारतीय मानवात ही तो तितक्याच प्रामुख्याने दिसून येतो. त्याला जे आश्चर्यकारक, निसर्गविषयक अनुभव आले ते त्याने वेदांती कथामध्ये व अद्‌भूत कथामध्ये ग्रंथीत केले. आपले जीवनविषयक आदर्श त्याने 'रामायण', 'महाभारत' या सारख्या महाकाव्यात चित्रिता केले. अद्‌भूताचे आकर्षण व आदर्शाचे चित्रण हे या प्रारंभीच्या कथा वाङ्मयाचे मुख्य विशेष आहेत. कुसुमावती देशपांडे यांच्या वरील विवेचनावरून कादंबरी वाङ्मय प्रकाराचा उग्म हा प्राचीन ग्रंथातून झाल्याचे जाणवते. आधुनिक काळाचा विचार करता असे दिसून येते की, कादंबरीचा उग्म १८ व्या शतकात युरोपात झाला. डिफो, रिचर्डसन, फिल्डींग हे युरोप मधील आद्य कादंबरीकार ठरतात. जपानमध्ये कादंबरी १२ व्या शतकात आणि चीन मध्ये १५ व्या शतकात अस्तित्वात आली. हे डायना स्पिअरमनचे विधान विचारात घ्यावे लागते.

एकंदरीत कादंबरीच्या उगमाविषयी विचार करता असे दिसून येते की, आजच्या कादंबरीत समाविष्ट असलेल्या घटकाची बीजे प्राचीन काळापासून जे कादंबरी सदृश्यच लेखन झाले. त्यात सापडतात, पण एक वाङ्मय प्रकार म्हणून कादंबरीने धारण केलेला

रूपबंध मात्र अर्वाचीन आहे. या संदर्भात मीनाक्षी मुखर्जी लिहितात की, '१९ व्या शतकातील युरोपमध्ये कादंबरी या वाङ्मय प्रकाराने स्पष्ट, स्वतंत्र व्यक्तिमत्त्व धारण केले तेव्हा त्याचा घाट हा आधीपासून अस्तित्वात असणा-या महाकाव्य, अद्‌भूतकथा व वीरकथा या कथन प्रकाराच्या संरचनापेक्षा भिन्न होता.' एकूणच आधुनिक कादंबरीचा उगम युरोपात झाला हे नाकारता येत नाही.

आधुनिक काळातील भारतीय कादंबरी लेखन हे पाश्चात्त्य कादंबरी लेखनाचा वारसा आहे. याविषयी पुष्टी देताना वि.सि. सरकटे म्हणतात की, 'जर कदाचित मराठी लेखकासमोर केवळ संस्कृत वाङ्मय नमुन्या दाखल असले तर लघुकथा किंवा कादंबरीचा प्रकार कितपत विकास पावला असता हा प्रश्न आहे. पण संस्कृत शिवाय फारशी व विशेषतः इंग्रजी वाङ्मयाचे भांडार मराठी लेखकांना या काळात उपलब्ध झाले व त्याच्या साहाय्याने मराठीत नाटका प्रमाणेच लहान-लहान कादंब-यांच्या संख्येत भर पडण्यास सुरूवात झाली. 'सरकटे यांच्या या मताला विरोध करताना कुसुमावती देशपांडे म्हणतात की, 'त्या त्या काळाच्या राजकीय घडामोडीमुळे जर सामाजिक जीवनाची घडी इतकी विस्कटली असती तर वाङ्मयाची व कथा प्रकारची कदाचित जास्त स्वाभाविकपणे कादंबरीच्या वेगवेगळ्या प्रकारात उत्क्रांती झाली असती. मराठीतील गद्य रचनेच्या प्रकाराची आठवण नसती व त्यांच्या अवशेषांची जास्त फसवणूक झाली असती तर या फारशी किंवा इंग्रजी सहाय्याशिवाय मराठी कादंबरीची उत्क्रांती झाल्याशिवाय राहिली नसती, असे निश्चितपणे म्हणता येईल.'कुसुमावती देशपांडे यांच्या या आशावादी भूमिकेतून स्पष्ट जाणवते की, इंग्रजांच्या व इंग्रजी वाङ्मयाच्या उगमापूर्वी ही भारतात कादंबरी या वाङ्मय प्रकाराला लागणारी सामग्री येथे उपलब्ध होती.'

मराठी साहित्यातील प्राचीन मध्ययुगीन काळातील वाङ्मयाचा विचार केला तर वारकरी संप्रदायातील ज्ञानेश्वरापासून तुकाराम महाराजांपर्यंत पंडितीचे वाङ्मय वामन पंडितापासून मोरोपंता पर्यंतचे वाङ्मय व राम जोशी पासून प्रभाकर यांच्या शाहिरी वाङ्मयात कादंबरी सारखीच वर्णनशैली दिसून येते.

सुप्रसिद्ध साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांनी कादंबरी वाङ्मयाची बीजे प्राचीन मराठी वाङ्मयात असल्याचे नमूद करताना म्हणतात की, 'लिळा चरित्र, स्मृतीस्थळ, बखरी, महिपती कृत चरित्रे हे रचना प्रकार कादंबरीशी जुळणारीच आहेत, परंतु आपल्या कादंबरीकाराने अनुकरणाने रूढ केली, तीच कादंबरी, असा अंध विचार पुढे येऊन तीन-पिढश त्यातच गेल्या.'

वरीलप्रमाणे कुसुमावती देशपांडे व भालचंद्र नेमाडे यांनी कादंबरीची बीजे प्राचीन वाङ्मयात शोधली असली तरी संस्कृतच्या प्रभावातून व इंग्रजी, फारशी भाषाच्या संपर्कातून कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा उदय झाला असे नमूद करावेसे वाटते.

आधुनिक काळात कादंबरीची लोकप्रियता पाहून अनेक साहित्यिकांनी व टीकाकारांने या कादंबरी विषयी जिज्ञासा निर्माण झाली. या वाङ्मय प्रकाराविषयी आपले मत प्रकट करण्यास सुरूवात केली. ह्या लोकांनी तिला व्याख्येत बांधण्याचा उपक्रम सुरू केला. कादंबरीला व्याख्येत बांधणे म्हणजे वाऱ्याची मोट बांधाच्यासारखे अवघड कार्य आहे. ही गोष्ट लवकरच त्यांच्या लक्षात आली. मानवी जीवनाचे चित्रण करणा-या कादंबरीचे स्वरूप, आकार गुंतागुंतीचे असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे तिला व्याख्येत बांधणे कठीण होऊन बसले. आटोपशीर व्याख्या करू पाहता ती तुटक होते व मोठी केली असता क्लिष्ट होते. असा अनुभव बहुतेकांचा आहे. त्यामुळे तिच्या व्याख्येत विविधता व विचित्रता आली असली तरी तो एक समृध्द वाङ्मय प्रकार म्हणून आपल्या समोर उभा आहे.

वाङ्मयाचा कोणताही प्रकार स्वयंभू असत नाही. तो तो वाङ्मय प्रकार ओळखण्यासाठी व ठरवण्यासाठी त्याला विशिष्ट साच्यामध्ये बंदिस्त करावे लागते. याला वाङ्मयाचे घटक असे म्हणतात. हे घटक प्रत्येक वाङ्मय प्रकारानुसार वेगवेगळी असतात. कथानक, व्यक्तिरेखा, संवाद, वातावरणनिर्मिती, निवेदन, भाषाशैली या सर्व घटकांचा विचार केल्यानंतर असे दिसून येते की, हे सर्वच घटक कादंबरीच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

सारांशाने असे म्हणता येईल की, हा वाङ्मय प्रकार पाश्चात्त्याच्या अनुकरणातून निर्माण झाला असला तरी 'कादंबरी' हे नाव भारतीयच असल्याचे जाणवते. हा आधुनिक वाङ्मय प्रकार पौराणिक कथेची प्रेरणा घेऊन उदयास आला आहे. या वाङ्मय प्रकारात विशाल असे मानवी जीवनाचे चित्रण आढळून येते. यामुळेच इतर वाङ्मय प्रकारापेक्षा उशिरा जन्माला आला असूनसुद्धा प्रसिद्धीच्या शिखरावर पोहचलेला आहे.

**निष्कर्ष :**

१. पौराणिक कथा प्रकारातून उदयास आलेला आधुनिक वाङ्मय प्रकार आहे.
२. पाश्चात्त्य साहित्याचा प्रभाव दिसून येतो.
३. बाणभट्टांनी लिहिलेल्या कथेला दिलेल्या नावावरून कादंबरी हे नाव प्रचलित झाले.
४. कादंबरी या शब्दाची व्युत्पत्ती 'कदंब' या वृक्षाच्या फुलापासून झाली असे दिसून येते.
५. विशिष्ट अशा व्याख्येत समाविष्ट न होणारा वाङ्मय प्रकार आहे.
६. विशिष्ट अशा घटकामुळे एक समृद्ध असा वाङ्मय प्रकार असल्याचे जाणवते.

७. आधुनिक काळातील एक लोकप्रिय वाङ्मय प्रकार म्हणून कादंबरीची ओळख असल्याचे जाणवते.

**संदर्भ :**

१. 'वाङ्मयीन संज्ञा- संकल्पना कोश', संपा : प्रभा गणोरेकर, वसंत डहाके, सदानंद भटकळ, आशा राजवाडे, रमेश वरखेडे, जी. आर. भटकळ फाऊंडेशन, ३५/सी, पं. मदनमोहन मालवीय मार्ग, मुंबई-४०००३४, प्र.आ., डिसें. २००१

२. 'मराठी कादंबरी- पहिले शतक', कुसुमावती देशपांडे, मुंबई मराठी साहित्य संघ, डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई-४, द्वि.आ. १९७५

३. 'कादंबरी एक वाङ्मय प्रकार', जान्हवी संत, मोघे प्रकाशन, कपिलेश्वर रस्ता, कोल्हापूर-२, प्र.आ. १९७१

४. 'केतकरी कादंबरी', दुर्गा भागवत, मौज प्रकाशन गृह, खताववाडी, गिरगाव, मुंबई-४०००३४, प्र.आ. १९६७

५. 'टीका स्वंयवर', भालचंद्र नेमाडे, साकेत प्रकाशन प्रा.लि., १५५, महात्मा गांधी नगर, औरंगाबाद-४३१००५, प्र.आ., सप्टें. १९९०

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com